।। श्री गणेशदत्तगुरुभ्यो नमः ।।

# प्रसाद

पं. धुंडिराजशास्त्री दाते (पंचांगकर्ते)
अध्यक्ष
प. पू. श्री. दत्तमहाराज गौरव समिती

साधक बंधु भगिनींनो,

परम पूजनीय ब्रह्मश्री दत्तमहाराज यांचा सहस्रचंद्रदर्शन विधी सोहळा ह्या वर्षी संपन्न होत आहे. त्या निमित्ताने अक्षरशः महाराजांचे आसेतू हिमाचल पसरलेले आपण सारे शिष्य, भक्त पुण्यनगरीत एकत्र येत आहोत. महाराजांची चारित्र्यसंपन्नता, प्रगाढ विद्वत्ता, निस्सीम वात्सल्य, शांत वृत्ती, निरासक्त जीवन, ज्ञानसंपन्न पण गंगेच्या प्रवाहासारखे निर्मळ अन् प्रभावी वक्तृत्व आणि या सर्व गुणसमुदायाला उजळून टाकणारे विनयशीलतेचे कोंदण हे आपणा सर्वांच्याच परिचयाचे आहे.

**'सहस्रचंद्रदर्शन' विधीची अधिदेवता मृत्यूंजय आहे. त्यामुळे ह्या विधीने दीर्घायुरारोग्य लाभून आपणाला सन्मार्गदर्शनाचा लाभ होणार आहे. प. पू. योगिराज वामनराव गुळवणी महाराजांची सहस्रचंद्रदर्शन सोहळा प. पू. दत्तमहाराजांच्या सत्यसंकल्पानेच झाला होता. त्यानंतर सोन्याला सुगंध यावा किंवा परिमलाला स्वाद असावा असा सहस्रचंद्रदर्शन सोहळ्याचा पुनर्योग आलेला आहे. हा सोहळा परमेश्वराच्या हजारो हातांनी संपन्न होत आहे.**

त्याचे प्रत्यक्ष असे प्रतीकात्मक रूप आपल्या सर्वांजवळ असावे या उद्देशाने हा 'प्रसाद' चा प्रपंच !

दुर्लभ असा मनुष्यजन्म मिळाल्यानंतर असा दुर्मिळ सोहळा आपल्याला पाहण्याचा योग लाभला आहे. हे पूर्वसुकृताचे फळ असेल. महात्म्यांचा, सत्पुरुषांचा, सद्गुरुंचा प्रत्यक्ष सहवास आपल्याला सतत लाभावा, त्यांची सेवा करता यावी, त्यांच्या नित्य दर्शनाने डोळ्याचे पारणे फिटावे, त्यांच्या अमृतवाणीने रोज आपले कान तृप्त व्हावेत असे प्रत्येक साधकालाच तीव्रतेने वाटत असते आणि ते अस्वाभाविक नाही. पण व्यवहारतः अशक्य आहे. पण या गुरुमाऊलीचे विचार, त्यांनी लिहिलेले ग्रंथ, त्यांची प्रवचने हा सुध्दा अप्रत्यक्ष असा गुरुसहवासच आहे आणि तोही प्रत्यक्ष गुरुसान्निध्याइतकाच मोलाचा आहे.

म्हणूनच 'सहस्रचंद्रदर्शन' विधीच्या निमित्ताने प्रत्यक्ष महाराजांनी दिलेला आशीर्वाद, त्यांचे प्रकट चिंतन, एक अभ्यासपूर्ण प्रवचन, 'सहस्रचंद्रदर्शन' विधीचे महत्व व त्यामागचा उदात्त हेतू असे हे एक छोटेसे संकलन आहे. आशीर्वाद देणारे महाराजांचे प्रसन्न छायाचित्र पाहताच आपल्या मनातले विकल्प, विक्षेप दूर व्हावेत, उपासना अधिकाधिक उत्तम व्हावी, गुरुपदेश प्रत्यक्ष आचरणात प्रतिबिंबित व्हावा, मनाचे संतुलन, शांती आणि द्वेषरहित बुध्दी यांचा प्रसाद मिळावा, एवढीच कळकळ.

शेषं मौनेन पूरयेत् ।

॥ श्री गणेश गुरूभ्योनमः॥

# सहस्त्रचंद्रदर्शन शांतिनिमित्ताने प. पू. श्री दत्तमहाराजांनी दिलेले आशीर्वाद आणि साधकांसाठी चिंतन.

यन्नामस्मरणाद्दैन्यं पापं तापंच नश्यति
भीतिग्रहार्तिदुःस्वप्नं दत्तात्रेयं नमामि तम्॥

भगवान शंकराचार्य महाराजांनी जगामध्ये तीनच गोष्टी दुर्लभ आहेत असं सांगितलं आहे, विवेकचूडामणी मध्ये,

दुर्लभं त्रयमेवैत् देवानुग्रहहेतुकम्।
मनुष्यत्वं मुमुक्षत्वं महापुरुषसंश्रयः॥

आचार्य महाराज सांगतात या तीनच गोष्टी दुर्लभ आहेत. त्यांच्यासाठी फार प्रयत्न करावे लागतात. पहिली म्हणजे मनुष्य जन्म प्राप्त होणं. मनुष्य जन्म अत्यंत दुर्लभ आहे. मनुष्य जन्म मिळाला आणि संसारामध्येच मन गुंतून राहिलं तरी त्या जन्माचा काही उपयोग नाही. त्या करिता मुमुक्षत्व पाहिजे. मोक्षाची इच्छा, आपली सर्व दुःख दूर व्हावीत; कर्म बंधनातून आपण मुक्त व्हावं अशी इच्छा उत्पन्न होणं ही दुर्लभ गोष्ट आहे. आणि तिसरी म्हणजे ''महापुरुष संश्रयः''

बाकी सगळे जीव हे पुरुष आहेत. पुर म्हणजे शरीर. शरीरामध्ये राहाणारे. पण महापुरुष त्याला म्हणतात - ज्यांच्या जवळ मनुष्यत्त्व आहे, मुमुक्षत्व आहे; मनुष्य जन्माचं सार्थक ज्याने करून घेतलेलं आहे. अशा महापुरुषांची संगती ही अत्यंत दुर्लभ आहे. असं शंकराचार्य महाराजांनी सांगितलं आहे.

त्या प्रमाणे चांगल्या कुळामध्ये जन्माला येणं हे ईश्वर, सज्जनांच्या, सत्पुरुषांच्या कृपेनं शक्य आहे. हे मनुष्यत्व आम्हाला मिळालं. त्यानंतर मुमुक्षत्व हे अत्यंत दुर्लभ आहे, कठीण आहे; असं जे आचार्य महाराज सांगताहेत हे खरं आहे. परंतु तेही प्राप्त होण्याकरता ''महापुरुष संश्रयः'' त्यांनी सांगितला आहे. त्याप्रमाणे लहानपणापासून महापुरुषांचा संश्रय, संगती ही ईश्वर कृपेनं मिळाली. त्या संगतीचा उपयोग मुमुक्षत्व उत्पन्न होणं, वाढणं यासाठी झाला पाहिजे. हे किती झालं आहे, किती व्हायला पाहिजे हे त्यांनाच ज्ञान आहे.

तर या जन्मामध्ये असे महात्मे, महापुरुष, त्यांच्या मार्गदर्शनाप्रमाणे कार्य आतापर्यंत झालं. पूर्व संचिताप्रमाणे काही विद्याभ्यासही झाला. त्याच प्रमाणे काही थोडी फार सेवाही घडलेली आहे. आणि आज या वेळेला वयाची ऐंशी वर्षे पूर्ण झाल्यामुळे धर्मशील सज्जनांनी सहस्त्रचंद्र दर्शनशांति हे शास्त्रविहीत असं कर्म करावं अशी इच्छा बाळगून ईश्वरी प्रेरणेप्रमाणे हे कार्य त्यांनी केलेलं आहे. या सहस्त्रचंद्रदर्शनशांतीच्या निमित्ताने वैयक्तिक शास्त्राप्रमाणे काही आयुरारोग्य याला प्रतिबंध होऊ नये, ते राहावं असं शास्त्राप्रमाणे सांगितलं आहे. ते काय असेल ते फल मिळेल. परंतु विशेषतः या निमित्ताने वेदशास्त्रज्ञ मंडळी ही या ठिकाणी आशीर्वाद देण्याकरता जमलेली आहेत. पुण्यकर्म मोठं आहे. पंचायतन त्यागयोजना केलेली आहे, स्वाहाकार आहे, शतचंडी आहे; अशी मोठी मोठी पुण्यकर्म विधिज्ञ मंडळींच्या नेतृत्वाखाली इथे होऊन राहिली आहेत. ते पाहणं हे सुद्धा, मोठं पुण्यकर्मच आहे. कारण जी काही धर्मशील मंडळी आहेत त्यांच्या इच्छेप्रमाणे हे कार्य घडत आहे.

यत्र द्रव्यांशः तत्र पुण्यांशः या शास्त्र सिद्धांताप्रमाणे या कर्मांचा पुण्यांश हा त्यांनाच मिळणार आहे. आपण फक्त ते पहाणारे आहोत. मनुष्य जन्म मिळाल्यानंतर असे पुण्यकर्म पहायला मिळत आहे, सर्व मंडळींचे दर्शन होत आहे, आशीर्वाद मिळताहेत हे एक समाधान सद्‌गुरू महाराजांच्या कृपेने या वेळेला मिळालेलं आहे. या निमित्तानं काही तरी एक चांगलं चिंतन म्हणून प्रसिद्ध करून, एक सद्‌विचार हे ही प्रसिद्ध करायची सर्व मंडळींची इच्छा आहे.

सद्‌गुरू वासुदेवानंदसरस्वतीस्वामीमहाराज यांनी अशा प्रकारची लहान लहान स्तोत्रेही पुष्कळ केलेली आहेत. त्यात त्यांनी निरनिराळे शास्त्र सिद्धांत मार्गदर्शनपर असे दाखवले आहेत. तेव्हा त्यांचंच एक स्तोत्र - गुरूस्तुती म्हणून गाणगापूरमध्ये झालेली - त्या गुरूस्तुतिसंबंधी काही थोडसं चिंतन हे झालेलं. ते आणखी छापावं, सर्वांना द्यावं, सर्वांनी त्याचा विचार करावा. महापुरुषांचा प्रत्यक्ष समागम झाला नाही तरी त्यांचे विचार जे आहेत, सिद्धांतस्वरूप ते ईश्वराचे विचार आहेत. त्या विचारांची संगती मिळावी, ते विचार आणखी आपल्या मनामध्ये रहावे, त्या प्रमाणे आचरण व्हावं, हा हे चिंतन प्रकाशित करणाऱ्या समितीचा उद्देश आहे.

तेव्हां यथामती त्या स्तुतिबद्दल जे काही थोडं फार चिंतन झालं आहे ते चिंतन आणखी प्रकाशित करून सर्वांना देण्याची इच्छा या समितीची आहे. तेव्हा त्याला अनुसरून सर्वही मंडळींनी असेच विचार करावेत, असंच आचरण करावं आणखी दुर्लभ अशा प्रकारचा मनुष्यजन्म, त्यातही अत्यंत दुर्लभ अशी महात्म्यांची संगती ज्यांना ज्यांना मिळालेली आहे त्यांना त्या संगतीच्या योगाने मार्गदर्शन होतच राहाणार आहे. प्रतिबंध जरी झाला काही प्रारब्धाने तरी ती फुकट जाणार नाही.

भगवान् श्रीकृष्णांनी युद्धाच्या आरंभी मोहात सापडलेल्या अर्जुनाला गीता - ज्ञानाचा उपदेश केला. त्याचा मोह त्या वेळेला दूर केला. युद्ध केलं त्याने विजयी झाला तो. पण ते गीताज्ञान त्या वेळेला काही आठवेना. श्रीकृष्णांना तो ''पुन्हा सांगा'' म्हणाला. ''नाही, आता मला सुद्धा सांगता येणार नाही,'' भगवान् म्हणाले.

पण त्यांनी सांगितलेलं गीताज्ञान, त्यांचा उपदेश, त्यांचं मार्गदर्शन हे शेवटी एकदम अर्जुनाला मिळालं अस सांगतात. तसा भागवतामध्ये उल्लेख आहे. गोपालकृष्ण निजधामाला गेले. अर्जुन द्वारकेमध्येच राहिला. सगळे यादव गेले. मग अर्जुनाला अतिशय शोक झालेला आहे. लहानपणापासून भगवंताची संगती. त्यांच्यावर अत्यंत प्रेम आणि भक्ती. आणखी आपल्याला सोडून गेले भगवान्. अशा अत्यंत शोक झालेल्या अवस्थेमध्ये, व्यास महर्षी लिहीताहेत की ते दिव्य ज्ञान एकदम त्याच्या चित्तामध्ये प्रकट झालं आहे. आणि त्यामुळे याचा सगळा शोक गेला. उत्तम ज्ञान संपन्न झालेला अर्जुन द्वंद्वातीत अवस्थेमध्ये जाऊन पोहोचला आहे.

म्हणजे संतांचं मार्गदर्शन हे काही फुकट जात नाही. काही प्रारब्ध प्रतिबंधांनी जरी ते स्थगित झालं तरी वेळ आली म्हणजे त्यांच्या संकल्पानं ते असं उत्पन्न होतं. महापुरुषांच्या संकल्पाने सगळं जगाचं कार्य चाललेलं आहे. ईश्वरालासुद्धा संमती द्यावी लागते त्यांच्या संकल्पाला. कोणत्याही पुण्यकर्मामध्ये त्यांचाच संकल्प आहे. ''सर्वे भद्राणि पश्यन्तु'' असा त्यांचा संकल्प आहे. मंगल कार्य व्हावीत, सगळ्या लोकांना सर्व मंगल पाहायला मिळावं ही त्यांची इच्छा आहे. त्यांचा संकल्प आहे.

त्याप्रमाणे सगळी कार्य घडताहेत. निमित्त मात्र आपण सर्वही असतो. ही जाणीव, निरभिमानवृत्ती, खरा कर्मयोग ज्याला म्हणतात ही भूमिका त्यांच्याच संकल्पानें मिळते, कृपेने प्राप्त होते. तेव्हा या सहस्त्रचंद्रदर्शनशांतीकर्माच्या निमित्ताने सर्व पुण्य कर्म, मोठ मोठ्या वेदशास्त्रांचा अभ्यास केलेल्या मंडळींच्याकडून होऊन राहिलेली आहेत. त्या निमित्ताने सद्‌गुरू वासुदेवानंदसरस्वतीस्वामीमहाराजांचे विचार, सिद्धांत हे ही आपल्या समोर आलेले आहेत. त्याचाही सर्वांनी विचार करून ते सिद्धांत आपल्या चित्तामध्ये स्थिर राहावेत. अत्यंत दुर्लभ अस मनुष्यत्व, त्याची

जाणीव रहावी, मुमुक्षा उत्पन्न व्हावी, सत्पुरुषांचा, महापुरूषांचा समागम हा नेहमी असावा, व्यक्त अव्यक्त कोणाच्याही रुपाने त्यांची संगती निरंतर राहिली म्हणजे मिळालेले मनुष्यत्व हे सार्थकी होणार आहे. एवढं या प्रसंगाने व्यक्त करून ज्ञानेश्वर महाराजांनी शेवटी पसायदानामध्ये हेच सांगितलेल आहे. तीन ओव्या सत्पुरुषांचं महत्त्व वर्णन करण्यासाठी त्या पसायदानामध्ये मुद्दाम घातलेल्या आहेत.

**चंद्रमे जे अलांछन मार्तंड जे तापहीन**
**ते सर्वाही सदा सज्जन।**
**सोयरे होतु।**

त्यांनी प्रार्थना देवाची केलेली आहे. संसार बंधनामध्ये संसारसागरामध्ये सांपडलेल्या जीवाने प्रार्थना करायला पाहिजे की अशी संगती आम्हाला मिळावी. पण ते महापुरुष स्वतःच देवाजवळ मागताहेत की सर्वांना असे महापुरुष सोयरे मिळावेत. त्यांची गाठ पडावी, त्यांच मार्गदर्शन यांना मिळावं ही प्रार्थना स्वतःच ते करताहेत. ही त्यांची दयादृष्टी आहे, समदृष्टी आहे. गुणदोषांकडे काहीही न पहाता - सर्वेऽपि सुखिनः सन्तु - ही खरी भावना त्यांच्या चित्तामध्ये आहे. म्हणून अशी प्रार्थना ते करताहेत.

त्यांचा संकल्प आहे. तो संकल्प जरी आपल्या मनामध्ये आपण ठेवला की आपली काही दुरित आड़ आली तरीसुद्धा त्यांनी ज्या अर्थी म्हटलेल आहे की सत्पुरुषांचा समागम सगळ्या लोकांना व्हावा, सत्पुरुष सगळ्या लोकांना भेटावेत हा त्यांचा संकल्प ईश्वरकृपेने केव्हां तरी निश्चित पूर्ण होईल. केव्हां तरी दूरित प्रतिबंध आपला दूर होईल. अशा प्रकारची श्रद्धा, विश्वास मनामध्ये बाळगून आणि ती तळमळ मनामध्ये धरून राहिलं म्हणजे सगळं कार्य होतंय. एवढच आणखी सगळ्या लोकांच्या समोर निवेदन आहे.

तशी संगती आता केव्हां घडेल, व्यक्त अव्यक्त रूपाने, पुढचा काल काही असेल शिल्लक राहिलेला तर त्या कालामध्ये थोडी फार घडावी एवढीच सद्गुरू महाराजांच्या चरणी शेवटची प्रार्थना.

श्री वासुदेव निवास
माघ व. २, श. १९११
पुणे.

॥श्री॥

# सहस्त्रचंद्रदर्शन विधी

।ममैवांशो जीवलोके जीवभूतः सनातनः।

प्रत्येक प्राणीमात्र हा भगवंताचा अंश आहे असे गीता सांगते. पाश्चात्य जीवन व भारतीय जीवन यांत जमीन - अस्मानाचे अंतर आहे. पाश्चात्य संस्कृती ही द्राक्ष (दारू सेवन करणारी) संस्कृती आहे तर भारतीय संस्कृती ही रुद्राक्ष संस्कृती आहे. पाश्चात्य जीवन हे भोगप्रवण आहे तर भारतीय जीवन हे त्यागप्रवण आहे. कर्मांनी, पूजेनी, द्रव्यादिकांनी अमृततत्त्वाची प्राप्ती होत नाही तर त्यागानीच अमृततत्त्वाची प्राप्ती होते. म्हणून आपल्याकडे सर्वच 'न मम' ही शिकवण दिली आहे. म्हणून भारतीय संस्कृती ही त्यागमय संस्कृती आहे.

मनुष्य जन्म मिळाल्यानंतर त्याचे ध्येय काय असावे? याचा विचार भारताखेरीज अन्य कोठेही केलेला नाही. पशू अन्नावर जगतात. माणूस मात्र महत्त्वाकांक्षेकरता, ध्येयाकरता जगतो हे माणसांचे वैशिष्ठ्य आहे.

परमेश्वराचा अंश म्हणून आपण जन्माला आलो आहोत. तर या अंशाने त्या पूर्णब्रह्म परमात्म्यामध्ये विलीन होणे हे मानवी जन्माचे अंतिम साध्य आहे. यालाच मोक्ष म्हणतात.

त्या परब्रह्मामध्ये विलीन होण्याकरता मन, बुद्धी, देह योग्य (पवित्र) झाले पाहिजे. या करिता आपल्याकडे अनेक मार्ग सांगितले आहेत.

॥स्वाध्यायेन व्रतैर्होमै स्थैविघेने ज्ययासुतैः॥
महायज्ञैश्च यज्ञैश्च ब्राह्मीयंक्रियते तनुः॥-

वेदाध्ययन, व्रते, होम, प्रजा, महायज्ञ व यज्ञ केल्याने हा देह ब्रह्मपद प्राप्तीला योग्य होतो असे मनूने म्हटले आहे.


हे सर्व करण्याकरता प्रथम भारतात जन्म मिळावा लागतो.

भरतखंडी नरदेह प्राप्ती। हे तो परमभाग्याची संपत्ति॥ असे नाथांनी म्हटले आहे.

ज्या भूमीला भगवंताचे चरण दहावेळा लागून ती पुनीत झाली आहे. अशा या श्रेष्ठ भारत देशांत आपणांस जन्म मिळाला. आपण किती भाग्यवान आहोत.

असा जन्म मिळाला असता त्याचे सार्थक केले पाहिजे. म्हणून वैदिक धर्म म्हणजे काय हे जाणून घेऊन तदनुरूप आचार करीत देह, चित्त शुद्ध कसे होईल हे पाहिले पाहिजे. या संबंधीचा सर्व विचार आपल्या शास्त्राने केला आहे. धर्माचरण करण्यातच म्हणजे धर्माच्या दास्यात खरे स्वातंत्र्य आहे. हे लक्षात येण्याकरता बुद्धी धर्मप्रवण करावी लागते. वर्णाश्रम विहित धर्माचे यथायोग्य पालन नित्य करावे लागते. या दृष्टीनेच ऋषी - मुनींनी सर्व आचार सांगितला आहे..

पूर्वकाळी कॉलरा, प्लेग, इत्यादी रोगांच्या साथीत ऐन तारुण्यात माणसे मरत असत. दीर्घायुष्य लाभणे हे कठीण होते. पण आता तशी स्थिती राहिली नाही. एक हजार चंद्रदर्शने झालेली माणसे तुरळक का होईना भेटतात. ही माणसे भाग्यवान आहेत.



अमावस्येनंतर शुद्ध पक्षातील द्वितीयेस जी चंद्रकोर दिसते त्यास चंद्रदर्शन असे म्हणतात. 'नवो नवो भवति जायमानः' दर महिन्याला नव्याने दिसणारा चंद्र असं; वर्णन केले आहे.

अशा फार थोड्या भाग्यवंतांपैकी प. पु. ब्रह्मश्री दत्तमहाराज हे आहेत. त्यांचा श्रेष्ठ आचार, विद्वत्ता, वक्तृत्व, विनय, त्यांची श्रेष्ठ योग्यता हे सर्व आपणांस विदित आहेच. यांचा सहस्रचंद्रदर्शन विधी या वर्षी होत आहे.

या विधीत सहस्रसंख्याक दर्शन गुणविशिष्ट चंद्र ही मुख्य देवता आहे. अधिदेवता मृत्यूंजय आहे व प्रत्यधिदेवता कालस्वरूप सूर्य आहे.

चंद्र म्हणजे मन आहे. मन हे अतिशय चंचल असते. ते या वयात पूर्णपणे शांत व समाधानी व्हावे म्हणून चंद्राचे पूजन सांगितले आहे. मृत्युंजय या नावातच अर्थ भरलेला आहे. कालाचे मापन सूर्यावरूनच करावे लागते. एका सूर्योदयापासून दुसऱ्या सूर्योदयापर्यंत एक दिवस या पद्धतीने महिना, वर्ष, इत्यादी. म्हणून येथे कालस्वरूप सूर्य ही देवता घेतली आहे.

या देवतांचे पूजन, हवन, इत्यादी करून

॥ सतिलं गुडसंमिश्रं अंजल्यर्धमितं पयः।
मार्कंडेयाद्वरं लब्ध्वा पिबाम्यायुर्विवृद्धये॥

या मंत्राने आयुष्यवृद्धीकरतां दुधात तीळ व गूळ घालून ते प्राशन करणेस सांगितले आहे.

नंतर अश्वत्थामा, बली, व्यास, इत्यादी सात चिरंजीव व मार्कंडेय यांची प्रार्थना करावयाची.

हा विधी केल्याने ती व्यक्ती पुण्यवान व ब्रह्मशरीरी होते. ब्रह्मधारणेस योग्य होते व त्या व्यक्तीपासून अनेकांना सन्मार्गदर्शनाचा लाभ होतो.

। तमेनं क्रियायुक्तं पुण्यकृतं ब्रह्मशरीरमित्याचक्षते।
वैखानस गृह्यसूत्र
ब्रह्मवित् ब्रह्मैव भवति।

## गुरूस्तुति (गाणगापूर)

जो सत्य आहे परिपूर्ण आत्मा जो नित्य राहे उदितप्रभात्मा।। ज्ञानें जयाच्या नर हो कृतार्थ। तो पूर्ण आनंद गुरू समर्थ।। १ ।। अखंड आत्मा अविनाशि दत्त। तया पदीं लाविति जे स्वचित्त।। वित्तभ्रमा सोडिति ते कृतार्थ। तो पूर्ण आनंद गुरू समर्थ।। २ ।। जो जागृतिस्वप्नसुषुप्तिसाक्षी। जो निर्विकारें सकला निरीक्षी। वीक्षी परी ज्यासि नसे निजार्थ। तो पूर्ण आनंद गुरू समर्थ।। ३ ।। जळीं स्थळीं सर्वहि वस्तुमार्जी। व्यापूनि राहेचि तयासि राजी। जो ठेवि भावें नर हो कृतार्थ। तो पूर्ण आनंद गुरू समर्थ।। ४ ।। जें दृश्य ते रूप नसे जयाचें। दृश्यांत राहे अविकारी ज्याचें।। स्वरूप तोचि अविनाशि अर्थ। तो पूर्ण आनंद गुरू समर्थ।। ५ ।। दृश्यासि घेतां न च घेववें जें। स्वरूप तत्स्थ प्रभुचें स्वतेजें।। स्वयें प्रकाशें जगिं जो परार्थ। तो पूर्ण आनंद गुरू समर्थ।। ६ ।। असोनि सर्वत्र गुरूप्रसादा। विना न लागे करतांहि खेदा।। भेदाचि वार्ता करि जो अपार्थ। तो पूर्ण आनंद गुरु समर्थ।। ७ ।। अनन्यभावें भजतां अनन्य। लभ्य प्रभू जो न च होयि अन्य।। संन्यस्तसर्वैषणतारणार्थ। तो पूर्ण आनंद गुरु समर्थ।। ८ ।।

इति श्री प. प. श्रीवासुदेवानन्दसरस्वतीविरचिता गुरूस्तुतिः।।

भारतवर्षामध्ये ईश्वर आणि सद्‌गुरू यांचे विशेष महत्व आहे. ईश्वरभक्ती तरी असावी अथवा गुरूभक्ती तरी असावी. ईश्वरभक्तीमध्येहि पुष्कळ प्रकार आहेत. गुरूभक्तीमध्येही प्रकार आहेत.

देहाने, वाणीने, मनाने ही उपासना घडावी ही त्रिकरण - तिनही साधने आहेत. देहाचाही उपयोग साधनेमध्ये झाला पाहिजे. वाणीचाही झाला पाहिजे. मनाचा उपयोग तर अत्यंत आवश्यक आहे मनाकरता तर ही सर्व साधने आहेत. प्रथमपासूनच पाहिजे त्या उपासनामार्गामध्ये, मार्गदर्शकाची जरूरी आहे, व्यवहारात सुधा. परमार्थात तर अत्यंत आवश्यकच आहे.

अनेक प्रकारचे संशय मनामध्ये उत्पन्न होत असतात. ग्रंथ जरी असले तरी केवळ ग्रंथावरून योग्य मार्गदर्शन घडत नाही. मनामध्ये आलेले संशय हे ग्रंथ कसे दूर करणार? प्रत्यक्ष शब्दाने, वाणीने सुधारणा करणारा असा कोणी तरी पाहिजे. सद्‌गुरूंचं, आचार्यांचं लक्षण सांगताना कोणत्या आचार्यांना शरण जावं हे भागवतामध्ये सांगितलेलं आहे.

**शब्दे परेच।। निष्णातम् दुर्लभं गुरुमाश्रयेत्**

आचार्य, गुरू परंपरा, ज्ञानी महात्म्यांची परंपरा जी भारतामध्ये आहे, ते ज्ञानी महात्म्ये कसे असतात? - शब्दांनीही समजावून सांगणारे. प्रश्न विचारणाऱ्या शिष्याच्या मनात जिज्ञासा असली तरी गुरूबद्दल श्रद्धा प्रथमपासून निर्माण झालेली नसते. इच्छा आहे, कोणीतरी मार्गदर्शन करणारा भेटला पाहिजे म्हणून. पण कोणते प्रश्न विचारायचे, कसे विचारायचे, ही काही पद्धती कळत नसते. ते आपले विचारतात.

पण त्याचे कोणतेही प्रश्न जरी आले - सद्‌बुद्धीने असो, परीक्षा घेण्याच्या बुद्धीने असो; कोणत्याही उद्देशाने त्याने प्रश्न केले तरी शब्दांनीच त्याचं समाधान करता आलं पाहिजे. शब्दांनी पूर्ण समाधान हे प्रथम होत नाही. अनेक संदेह, संशय मनामध्ये उत्पन्न होतात. कदाचित एकनिष्ठ जर शिष्य असेल. फक्त परमार्थमार्गामध्ये आपली प्रगती व्हावी. व्यावहारिक गोष्टींपासून प्रथमपासूनच जो निवृत्त झालेला असेल आणखी आपली जी काही इष्ट देवता म्हणा, भक्ति ज्या स्वरूपावर आहे; त्याला शरण गेलेला असा जो असेल त्याच्या मनामध्ये जास्त संशय उत्पन्न करणारी साधने नसतात. त्याची आपली एक उपासना चालू असते.

''सावधान'' म्हणून शब्द कानावर पडल्याबरोबर समर्थ निघाले. आरंभापासूनच त्यांची तिकडे वृत्ती होती. तसे संस्कार त्यांच्यावर झाले होते. आणि दुसऱ्या शास्त्रीय किंवा ऐतिहासिक दृष्टीने म्हणा मारूतीरायांचे ते अवतारही होते. पण लौकिक दृष्टीने आपला विचार करायचा आहे. उपनयन झालेले आहे. विवाहाला आईच्या आज्ञेवरून उभे राहिलेले आहेत. सावधानता चित्तामध्ये प्रथमपासूनच असली पाहिजे. एक समर्थांचे उदाहरण आहे. अंतरपाट धरलेला आहे. मंगलाष्टक सुरू झालेली आहेत. असा कोण निघून जातो? असं दुसरं उदाहरण आहे का? एक बोट कनिष्ठिका घातल्यावर दुसऱ्या कोणाचं नावच घेता येत नाही.

ही सावधानता प्रथमपासूनच असली पाहिजे. म्हणूनच त्यांचे सांगतात ना? रात्र रात्र मारुतीच्या मंदिरात जाऊन बसायचे, जगाची चिंता करतो म्हणायचे. निघून गेलेले आहेत नाशिकला आणखी गायत्री पुरश्चरण केले. ईश्वरशक्तीचे प्रतिपादन त्या गायत्री मंत्रामध्ये आहे. त्याचे नाव यांत नाही. सर्व नावे त्याचीच आहेत. सर्वव्यापी, अंतर्बाह्य दोन्ही ठिकाणी असणारा. बुद्धीमध्येही आहे, अंतःकरणामध्येही आहे. बाह्य विश्वामध्येही आहे.

आमची बुद्धी धर्माकडे जाणारी असेल, कदाचित अधर्माकडे जाणारी असेल जे संस्कार घेऊन आम्ही जन्म घेतला आहे, मागच्या जन्मात जे कर्म केलेले आहे तसे संस्कार आमच्या बुद्धिवर झालेले आहेत. योग्य मार्गदर्शन

करणारा भेटला असेल तर चांगले संस्कार होतील. तसे घेऊनही जन्माला येता येते. धर्म अधर्म दोन्हीकडे बुद्धी जाणारी आमची.

त्या बुद्धीला प्रेरणा करणारा जो आहे; बुद्धी म्हणजे अंतःकरण किंवा मन ज्याला म्हणतात ते पांच भौतिक आहे. पंचभूतांपासून निर्माण झालेली जशी बाहेरची शरीरे आहेत तसे मनही पंचभूतांपासून निर्माण झालेलं आहे. पण त्या मनामध्ये पंचभूतांचा सत्वांश जास्ती आहे. शास्त्राच्या दृष्टीने विचार केला असता वेदांत शास्त्रामध्ये पांचही भूतांचा अंश अधिक आहे मनामध्ये. नैसर्गिक अशी मनाची उत्पत्ती आहे. ते सत्वांश घेऊन जन्माला आलेलं मन दुसरीकडे का जाते? राजस, तामस का बनते? त्याला तसा संपर्क होतो.

संगती. दुसऱ्याच्या मनाची, वाणीची संगती झाली की मनाचा आपला सत्वांश कमी कमी होतो. रजोगुण, तमोगुण अधिक होतो. समर्थांनी "मनाचे श्लोक" करीत असताना "मना सज्जना भक्ति पंथेची जावे" मनाला 'सज्जना' म्हणून संबोधन केले आहे. मन हे खर चांगलं आहे. मनाने ईश्वराला जाणायचे आहे. सृष्टीकर्त्याने आरंभाला इतर जीवांप्रमाणेच मन निर्माण केलं. इतर पशु पक्षी वगैरे जीव निर्माण केले. परंतु त्याचे समाधान झाले नाही. मनुष्याला जेव्हा निर्माण केले त्यावेळेला मात्र ईश्वराला समाधान वाटलं. हा एक योग्य आहे. हा मला जाणू शकेल. मला जाणण्याची योग्यता याच्या ठिकाणी आहे. त्याकरताच मन दिलेले आहे. सत्वांश अधिक घालून तयार केलेल मन हे मानवाला मिळाल आहे.

त्या मानाने ईश्वराला जाणण्याची आपली योग्यता टिकवली पाहिजे, वाढवली पाहिजे. ती टिकवणे म्हणजे कठिण आहे. पूर्व जन्मामध्ये अधर्माचरण करून तसे संस्कार घेऊन जे जन्माला आलेले असतील त्यांच्या संगतीमध्ये चांगले मन असलेला जीव सापडला तर ते बदलते त्याचे मन. दुसऱ्याच्या शब्दाचा, आचरणाचा त्याच्या मनावर परिणाम होतो. दुसऱ्याकडे बंगला आहे, मोटार आहे, हे सगळ (ऐश्वर्य) आहे हे पाहिल्यावर ते आपल्याला मिळावं असे वाटते.

चांगले जरी संस्कार मनामध्ये असले तरी ते टिकत नाहीत ना! मोह उत्पन्न होतो. या मोहामुळे मनातले सगळे संस्कार बदलून जातात.

कैकेयी प्रथम रामावर फार प्रेम करत होती. त्या मंथरेचे मन हे पहिल्यापासून तामस गुणयुक्त होतं. सबंध राजवाड्यामध्ये गडबड चालली आहे, वाद्य वाजताहेत. काय चाललं आहे याची तिने चौकशी केली. तिला समजलं रामाला राज्याभिषेक होतोय.

तर ही जी मनाची स्थिति आहे. आपलं अंतःकरण शुद्ध, अशुद्ध काही कळतं नाही आपल्याला. आपल्या मनाप्रमाणे वागणारा जो असेल तो आपला मित्र आणि मनाच्या विरूद्ध वागणारा शत्रू ठरतो. मनाच्या विरूद्ध सांगणारा जो आहे तोही शत्रू ठरतो. रावणाला किती लोकांनी सांगितलं, दुर्योधनाला किती लोकांनी सांगितलं! पण नाही, ऐकलं नाही त्यांनी. म्हणून विरूद्ध जरी वाटले आपल्या मनाला तरी त्या वेळेला ते बरोबर नाही असे वाटते. हिताचे जे असते, हितकर्ते जे असतात, ज्यांच्या मनामध्ये काही दोष नाही, निर्दोष ज्यांचे मन आहे त्यांना दुसऱ्याचं हित कोणतं आणि अहित कोणतं हे समजतं. आणि समजण्याकरता सगळी शास्त्र आहेत ना!

संतांची संगती तयांना झालेली असते. ईश्वराने निर्माण केलेले जे ग्रंथ आहेत. वेद, शास्त्र वगैरे त्यांनी ऐकलेले असतात, वाचलेले असतात. त्यामुळे मानवाचं हित कोणतं आहे आणि अहित कोणतं आहे हे त्यांना समजलेलं असतं. त्याची मनोवृत्ती कुणीकडे निघालेली आहे, ती कशी वाढत जाणार आहे, शेवटी त्याचा नाश कसा होणार आहे, हे सगळं ते ओळखू शकतात. आणि त्या बाजूने जाणारी मनोवृत्ती ते वळवण्याचा प्रयत्न करतात. संतांची

संगती जी सांगितलेली आहे ती याकरता आहे. ते हिताचा उपदेश करतात, पण आम्हाला हित, अहित याची जाणीव नसते. आमच्या मनाला जे बरे वाटते तेच आम्हाला योग्य आहे. ते सांगणारा कोणी भेटला तर त्याचे ऐकायची जरूरी नाही. अशीच बुद्धी बनून गेलेली असती आमची आग्रही वृत्ती.

त्यामुळे दुसरा कितीही चांगला वागला तरी त्याचा हिताचा उपदेश हा काही आपल्याला पटत नाही. आपली मनोवृत्ती जशी बनलेली असेल; पूर्व संस्कार जसे त्या बुद्धिवर झाले असतील त्याप्रमाणे वागतो आपण. वाईट संस्कार असतील तर अधर्माचरणाकडे प्रवृत्ती होते. आणि धार्मिक संस्कार असतील तर तिकडे जाते. ही प्रेरणा फक्त ईश्वर करतो. सज्जन जे असतील, सदगुरू जे असतील ते हिताचा उपदेश करीत असतात. एकदा, दोनदा, दहा वेळा. दया आहे त्यांच्यामध्ये. हा चांगल्या मार्गाने निघालेला नाही आहे. याचे कल्याण होणार नाही. याच्याबद्दल त्यांच्या मनात दया उत्पन्न होते. सर्वच आपले लोक आहेत असे ते समजतायत ना!

आपल्या घरातला असेल तो तेवढा आपला आणि दुसरा बाहेरचा असेल तो परका ही त्यांची भावनाच नसते ना!

**हे विश्वची माझे घर।**
**ऐसी मति जयाची स्थिर।**
**किंबहुना चराचर।**
**आपण जाहला।।**

हे जे ज्ञानेश्वर महाराज सांगत आहेत तशी ज्ञानी महात्म्यांची वृत्ती बनलेली असते. त्यामुळे महात्म्यांचे त्यांच्या मनामध्ये दया आहे, कृपा आहे. हे पहिले लक्षण आहे त्यांचे. भगवान श्रीहरींनी उध्दवजींना उपदेश करताना हे लक्षण सांगितले. त्यामुळे ते उपदेश करीत असतात. त्यांच्या शब्दामध्ये सामर्थ्यही असते.

ज्यांची बुध्दी काही कारणाने बदललेली असेल. मूळं चांगली आहे, सात्विक आहे, धार्मिक आहे. संस्कार सगळे चांगले आहेत. कुसंगतीने फक्त थोडीशी बदललेली आहे. अशा वेळेला जर संतांची भेट झाली तर त्यांच्या शब्दांचा परिणाम लगेच होतो. रोग झाल्यावर लगेच जर डॉक्टरने तपासून औषध दिले तर तो लगेच बरा होतो. पुष्कळ काळ (न तपासता) गेल्या नंतर चांगल्या प्रसिध्द डॉक्टरला दाखवले तरी तो काय करणार? जुनाट रोगावर औषधाचा उपयोग कसा होणार? रोग्याने त्या डॉक्टरच्या सांगण्याप्रमाणे पुष्कळ दिवस औषध घ्यायला पाहिजे. तितका विश्वास याला (रोग्याला) नसतो. याला वाटते किती दिवस औषध घ्यायचे?

तर अशा प्रकारचे जे असतील सज्जन महात्मे, सदगुरु; त्यांच्या शब्दामध्ये सामर्थ्य आहे.

**आद्वे परेच निष्णातम.........**

हे सद्गुरुंचे लक्षण त्यांनी सांगितले आहे. शब्दामध्येही निष्णात आहेत, शब्दज्ञानही उत्तम आहे. कुठेही व्यवहारात व्याख्यान देणं नाही, कुठ जाणं नाही, काही नाही. पण मनाचा पूर्ण विचार झालेला आहे. स्वत:च्या मनाचे कोणचे कोणचे दोष आहेत याचा विचार करून ते स्वच्छ केलेले आहे आणि आता दुसऱ्याचे मन निर्दोष करण्याचा त्यांचा प्रयत्न चाललेला आहे. त्यांचे स्वत:चे कार्य संपलेले आहे. व्यक्तिगत काही कार्य राहिलेले नाही. पूर्ण आनंद त्यांनी मिळवलेला आहे. त्यामुळे अशा महात्म्यांचं लोकांकडे लक्ष जाणं हे लोकांचेसुध्दा सुदैव आहे.

कोण आपल्याला उपदेश करणार अशा प्रकारचा, यांना काय जरुर आहे? असे वाटून उपयोग नाही. चांगला मार्ग आहे. त्या मार्गाने आपल मन जाऊ शकत नाही. काहीतरी मनामध्ये प्रतिबंध आहे याची जर जाणीव असेल तर त्याकरता सांगणारा जो आहे त्याचे ऐकावे, कोणचे प्रतिबंध कसे दूर करता येतील हे तो सांगू शकतो ना! त्याकरता प्रयत्न करणे हा शब्दांचा परिणाम ज्यांच्यामुळे होतो, असेही महात्मे आहेत.

आणखी परब्रह्माचे ज्ञान झालेले आहे. स्वत:लाही ज्ञान झालेले आहे. दुसऱ्यालाही ज्ञान देऊ शकतात ते. ज्ञानेश्वरी आहे, एकनाथी भागवत आहे, अमृतानुभव आहे, ग्रंथ करून ठेवले आहेत संतांनी, प्रत्यक्ष ते असताना जर एखादा जिज्ञासूबुद्धिने गेलेला असेल त्यांच्याजवळ, तर त्याला सुद्धा ते सांगू शकतात ना! इतके ग्रंथ निर्माण करणारे जे आहेत त्यांना काय दुसऱ्याला सांगता येणार नाही? तर शब्दांनी आणखी दुसऱ्याला ज्ञान करून देणारे असे ते ज्ञानी महात्मे असतात. पूर्ण आत्मज्ञान त्यांना झालेले असते. परमेश्वराचे पूर्ण ज्ञान झालेले असते. त्याचे पूर्ण स्वरूप त्यांनी जाणलेले असते. म्हणजे ईश्वररूप ते झालेले असतात. ईश्वरामध्ये आणि त्यांच्यामध्ये भेदच राहात नाही. जीवभाव ज्यांचा गेलेला आहे. जीवनमुक्त ज्यांना म्हणतात. शरीर आहे पण मुक्त आहेत. कोणाचहि बंधन नाही, अहंकार नाही. दंभ नाही.

भगवद्गीतेमध्ये दैवी संपत्ती आणि आसुरी संपत्तीचे भगवंतांनी पुष्कळ वर्णन केलेले आहे. दैवी संपत्तीचा विकास ज्यांनी करुन घेतलेला आहे त्यामुळे आसुरी संपत्ति कशाला येईल त्यांच्याजवळ? शांती आहे, राग नाही. नाथमहाराजांना राग आणण्याकरता बक्षीस लावावे लागत होते. ही एकतो गोष्ट आपण. तर ही जी पूर्ण शांतीची स्थिती आहे, मन, बुद्धी अत्यंत स्थिर व्हायला पाहिजे. मनात कोणतेही विकार तरंग येऊन उपयोग नाही. समुद्राचे पाणी शांत आहे, लाटा नाहीत, काही नाही. तशी स्थिती ज्यांची ज्ञानप्रभावामुळे झाली आहे असे ज्ञानी महात्मे हे जाणायचे ते जाणतात. जे बाहेर पसरलेल आहे त्याची त्यांना जरूरच नाही. जे राहाणारच नाही आहे ते जाणून घेतले काय किंवा त्याच्याबद्दल आसक्ती धरली काय उपयोग काय आहे?

पुष्कळ आयुष्य मिळाले, पुष्कळ संपत्ती मिळाली तरी सुख मिळेल असे नाही. एक राजा चांगला होता.प्रजाजनांचे त्याच्यावर प्रेम होते. त्या सगळ्या लोकांनी ईश्वराची भक्ती केली, प्रार्थना केली. प्रसंन्न झाले ईश्वर. त्यांनी लोकांना विचारले, "काय पाहिजे?" लोक म्हणाले, "आमच्या राजाला दहा हजार वर्षे आयुष्य द्या." राजाला काही विचारले नाही काही नाही. "तुमचा राजा दहा हजार वर्षे जिवंत राहील" असे ईश्वराने सांगितले. राजाला येऊन सांगितले, "राजेसाहेब, तुम्हाला आनंदाची बातमी आहे. ईश्वराने तुम्हाला दहा हजार वर्षे आयुष्य दिले आहे." राजा म्हणाला, "काय केलंत तुम्ही? मला आधी विचारलं का नाहीत? मी दहा हजार वर्षे जगणार म्हणजे माझ्या देखत तुम्ही सगळे जाणार. मी दहा हजार वर्षे जगून काय करायचे?" म्हणजे आयुष्य राजाच वाढवल त्या प्रजाजनांनी प्रेमाने पण हित साधले नाही. राजाची दृष्टी वेगळी आहे.

हा विचार ते ज्ञानी महात्मे करतात. आयुष्य पुष्कळ आहे. परंतु मनाला शांती नाही, समाधान नाही. त्यामुळे अनित्य आणि दु:खमय सगळे आहे. अशा लोकांमध्ये तू जन्माला आला आहेस असे भगवान सांगताहेत. तेव्हां पूर्ण आणि नित्य आनंद जर तुला पाहिजे असेल तर माझं भजन तू कर. तर नित्य काय आहे आणि अनित्य काय आहे याचा पूर्ण विचार ज्यांनी केला आहे त्यांचे मनही तयार झालेले आहे. विवेकसंपन्न मन आहे. प्रत्येक वेळेला विवेक आहे. पूर्ण हित कोणचं इकडे त्यांच लक्ष आहे. आपल्या मनाला कसे बर वाटते इकडं लक्ष नाही.

तर तो विचार पूर्ण मनामध्ये असल्यामुळे ह्या बाह्य संसारामध्ये कितीहि उत्कर्ष दिसला, वाटला तरी ते सर्वही अनित्य आहे. दोन वर्गच त्यांनी केले आहेत. नित्य कोणचे आहे आणि अनित्य कोणचे आहे हे समजून घेण्याकरता

मन आहे. पण ते मन शुद्ध झाले पाहिजे. ते शुद्ध करण्याकरता त्याच्यामध्ये अशुद्धी किती प्रकारची आहे, ती कशी दूर करता येईल, त्याचे उपाय कोणचे हे जाणणारे कोणीतरी भेटले पाहिजे.

रोग्याला काही स्वत:ला कोणचा रोग झालाय कळत नाही. तो किती वाढला आहे, केव्हां जाईल याचे ज्ञान त्याला नाही ना! जो शरीरशास्त्रज्ञ असेल त्याच्याकडेच त्याला जावे लागेल. तो सांगेल त्याप्रमाणे औषध वगैरे उपाय करावे लागतील.

तर तशा संतांची, सद्गुरूंची जर भेट झाली तर योग्य मार्गदर्शन ते करीत असतात. असे जे महात्मे आहेत त्यांचं वर्णन महाराजांनी केलं आहे. गुरुस्तुती म्हणून सात आठ श्लोक आहेत. कोणी एक भक्त, तुकाराम नांवाचा गाणगापूरला देवाची सेवा करीत होता. स्वामी (प.पु. वासुदेवानंदसरस्वती) महाराजांना देवांनी आज्ञा केली, ''ह्याला तुम्ही काही तरी मार्गदर्शन करा.'' त्या वेळेला हे स्तोत्र त्यांनी केलं आहे. त्यापैकी एक श्लोक आहे. महत्वाचा आहे—

**अखंड आत्मा अविनाशी दत्त।**<br>**तया पदी लाविती जे स्वचित्त।**<br>**वित्तभ्रमा सोडीती ते कृतार्थ।**<br>**तो पूर्ण आनंद गुरु समर्थ।।**

या गुरुस्तुतीतल्या प्रत्येक श्लोकाच्या शेवटी ''तो पूर्ण आनंद गुरु समर्थ'' असे आहे. पूर्ण आनंदरूप सद्गुरु आहे. ''ब्रह्मानंदं परम सुखदं.....'' हे आनंदरुप सद्गुरुंचे स्वरुप आहे.

तर असे जे गुरु आहेत, पूर्ण आनंदरूप बनून गेलेले आणि ते समर्थ आहेत. शिष्याची सुधारणा करण्याचे सामर्थ्य त्यांच्या जवळ आहे. त्यांचे वर्णन केलेले आहे———

**अखंड आत्मा अविनाशी दत्त..........**

गुरु महाराजांच्या जवळ काय आहे! आत्मस्वरुप जे आहे, ईश्वरस्वरूप; ते ईश्वर स्वरूप म्हणजे एक आहे, अखंड आहे. ईश्वरभक्तीमध्ये जे अनेक प्रकार असतात त्यातून जाता जाता ईश्वर एक आहे, ही बुद्धि झाली पाहिजे. तरच तो ज्ञानाचा अधिकारी होतो. ईश्वर आणि जीव एक आहे हे शेवटी कळायचे आहे. मी ब्रह्मरुप आहे. मी संसारी नाही हे शेवटी कळायचे आहे.

पण अगोदर जीव कोण आहे हे स्पष्ट कळले पाहिजे. ईश्वर कसा आहे हे सुद्धा कळले पाहिजे. मग जीव आणि ईश्वर एक आहे हे नंतर ज्ञान होते. त्यातही पुन्हा **सद्गुरु हे ईश्वराचे स्वरूप आहे हे समजत नाही.** ईश्वर श्रेष्ठ आहे अशी कोणाची बुद्धि असते. तर दुसऱ्या कोणाला वाटते सद्गुरु हे निराळे आहेत. सद्गुरु हेच श्रेष्ठ आहेत. इथे श्रेष्ठ कनिष्ठ व्यवहार काही उपयोगी नाही. विश्व निर्माण करणे, त्याचं संरक्षण करणे आणि पुन्हा त्याचा उपसंहार करणे ही कार्य ईश्वराची आहेत.

**जीवांच्या बुद्धीतले दोष काढून टाकणे, त्यांची बुद्धी, मन हे स्थिर करणे; त्या बुद्धीमध्ये आत्मप्रकाश—ईश्वरस्वरुपाचा प्रकाश करणे हे कार्य सदगुरुंचे आहे.** ईश्वराचे ऑफिस निराळं आहे आणि सद्गुरुंचं ऑफिस निराळं आहे. निराळं आहे याचा अर्थ ते वेगळेवेगळे आहेत काय? कार्य करणारी रुप वेगळी

वेगळी आहेत.

म्हणून सद्गुरु स्वरूपाने हे कार्य परमात्मा करतो आहे. दत्तात्रेय, श्रीपाद श्रीवल्लभ, नृसिंह सरस्वती, वासुदेवानंद सरस्वती स्वामी महाराज , शंकराचार्य महाराज ही सगळी ईश्वराची रुपं आहेत. सद्गुरुरूपांनी आलेली आहेत. अज्ञानातून जीवाला बाहेर काढायच हे कार्य त्यांच्या पुढे आहे. आणि ते कार्य अखंड चालायचे आहे. म्हणून सद्गुरूमूर्ती अदृष्य रूप नाही, एक आहे.ईश्वरानेच सद्गुरुंचं रूप घेतलेलं आहे आणि त्या रूपाने ईश्वराचे कार्य चाललेले आहे.

तर हे जे ज्ञानी महात्मे आहेत ते ईश्वररूप बनलेले आहेत तेच सद्गुरु रूप आहेत. त्यांच पहिलं लक्षण सांगितलं आहे—

**अखंड आत्मा अविनाशी दत्त**
**तया पदी लाविती जे स्वचित्त।**

आपल अंतःकरण त्या परमेश्वराच्या चरणी ज्यांनी लावलेलं आहे. दुसरं काही नाही मनात. "विषय तो त्यांचा झाला नारायण" म्हणतात. मनामध्ये दुसरा विषय नाही. त्याच आनंदामध्ये ते निमग्न आहेत. मनामध्ये ईश्वराशिवाय दुसरं काही नाही.

संसारात राहूनही त्यांना त्याचं काही भान नाही. नाथ महाराज संसारीच होते. पूजा अर्चा चालू आहे. उत्सव वगैरे चालू आहे त्याच प्रमाणे प्रवचन चालू आहेत. अखंड चाललेलं आहे. अखंड ईश्वराच अनुसंधान चाललेलं आहे. ही स्थिरता बुद्धिमध्ये उत्पन्न झाली पाहिजे ना! स्थितप्रज्ञ म्हणून जे सांगितलं आहे दुसऱ्या अध्यायामध्ये भगवंतांनी. मनामध्ये कोणच्याहि वासना राहून उपयोग नाही. म्हणजेच त्याची बुद्धी स्थिर झाली. त्याला स्थितप्रज्ञ म्हणतात.

परमात्म्याच्या स्वरूपाच्या ठिकाणी अखंड अंतःकरण लागलेलं आहे. ते हे ईश्वरस्वरूप झालेले आहे—

**अखंड आत्मा अविनाशी दत्त।**

अखंड म्हणजे ज्याच्यामध्ये भेद काही नाही. अनंत देव आहेत भारतामध्ये. ईश्वराचे पूर्ण दर्शन म्हणजे एकच परमेश्वर आहे. मी सुद्धा त्याच्यापेक्षा वेगळा नाही. हे ईश्वराचं पूर्ण दर्शन आहे. नामदेवांना पाठवले पांडुरंगानी "जा तुला पक्क व्हायचंय ना. कच्चे मडके म्हटले म्हणून आपला अपमान झाला अस वाटलंयना? ईश्वराचे पूर्ण दर्शन होण्याकरता पूर्ण ज्ञानी जो महात्मा आहे त्याच्याकडे तुला जायला पाहिजे." वेळ लागत नाही. नामदेव गेले. ते सद्गुरु भेटले. त्यांच्या एका वाक्यानेच नामदेवांना पूर्ण बोध झालेला आहे. कारण सगुण भक्ती त्यांनी मिळवली होती ना. साक्षात्कार झाला होता. त्यामुळे ती पूर्णता यायला वेळ लागला नाही.

तर आत्मस्वरुप परमात्मा हा अखंड आहे म्हणजे एक आहे. सर्वत्र ईश्वर एक आहे. ही बुद्धी पाहिजे. गणेश पुराणामध्ये गणेशांनी गीतेचा उपदेश वरेण्य राजाला केला तेव्हा हे सांगितले. शिव असो, विष्णु असो, शक्ती असो, सूर्यनारायण असो. बाहेरून दिसणारी ही रुप. ह्या सर्वही स्वरुपामध्ये अभेद आहे. एक तत्व आहे. ही बुद्धी ज्याला उत्पन्न झाली तो मोठा योगी (योग्य) आहे. अखंड आहे परमात्मा, सर्वत्र एक आहे.

प्रल्हादजींच्या मनामध्ये आपल्या बापाबद्दल द्वेष काही आला नाही. प्राण घेणारा बाप आहे. हरीचे भजन सोडले

पाहिजे. माझा शत्रू आहे हरी. माझ्या भावाला त्याने मारलेले आहे. त्याचे तू भजन करतोस? पण प्रल्हादजी म्हणाले, मी भजन करीतच नाही. बुद्धिला प्रेरणा करणारा तो परमेश्वर आहे. त्याच्या प्रेरणेनं माझी बुद्धि तिकडं जाते. इतकी शुद्ध भक्ती आहे अंतःकरणामध्ये. म्हणजे कर्तृत्व स्वतःकडे घेतच नाही. मी भजन करतच नाही. आणि ही गोष्ट आहे.

आपण उपसाना करतो आहोत अस ज्याला वाटतं त्याची उपासना पूर्ण व्हायला अजून अवधी आहे असं समजावं.

केनापि देवेन हृदिस्थितेन
यथा नियुक्तोस्मि तथा करोमि।।

अशी बुद्धी आहे प्रल्हादजींची. त्यामुळे पित्याने जरी प्राण घेण्याचे अनेक प्रयत्न केले — तरी सुद्धा मनावर काहीही परिणाम नाही. तापलेल्या तेलाच्या कढईत टाकले, कड्यावरून ढकलले, गुहेत कोंडून धूर करून गुदमरून टाकण्याचा प्रयत्न केला. प्रत्यक्ष पिताच त्यांच्या जीवावर उठला होता. पण त्यांचं अखंड भजन चाललंय. परमात्मा एक आहे.

चांगले आणि वाईट ही खालची वृत्ती आहे. चांगले वाईट काही नाही. त्याच्या त्या बुद्धीला प्रेरणा करणारा ईश्वरच आहे. मला त्याच्या भक्तीची प्रेरणा करणाराही तोच आहे. त्यांत विरोधाचे कारण काय आहे? हा माझा शत्रू असे समजण्यास कारण काय?

त्यामुळे जरी कोणी कितीहि त्रास दिला, काही श्रम, कष्ट झाले तरी त्याच्याबद्दल उपेक्षा बुद्धि त्यांची (ज्ञानी महात्म्यांची) असते. ज्ञानसंपन्न पूर्ण भक्त जे आहेत त्यांना उपेक्षा आहे. या भौतिक सुखाकडे त्यांचे लक्षच नाहीये. म्हणून प्रत्यक्ष पित्याबद्दल सुद्धा प्रल्हादजींच्या मनामध्ये काही द्वेष नाहीये. नरसिंह प्रगट झाले. हिरण्यकश्यपूचा नाश केला. त्यांनी तेव्हां प्रल्हादजी म्हणाले, माझ्या पित्याचा उद्धार करा. अज्ञानामुळे त्यांनी तुम्हाला ओळखलं नाही. तुमची शक्ती माहीत नसल्यामुळे त्यांनी तुमचा द्वेष केला. त्याबद्दल त्यांना क्षमा करा. पण भगवंतानी त्यांना सांगितले, तुझ्या एकट्या पित्याचाच नव्हे तर तुझ्या एकवीस पिढ्यांचा उद्धार झाला आहे. कारण त्याच्या कुळामध्ये तुझ्यासारखा महान् भगवद् भक्त निर्माण झाला. त्यात भक्ताचे महत्त्व देवाने वर्णन केलं आहे.

तर ईश्वर स्वरुप अखंड आहे ही जर भावना मनामध्ये दृढ झाली तर राग द्वेषादिक विचार कशाला निर्माण होतील? मन हे अत्यंत स्थिर शांत राहाणार आहे. आणि तो अविनाशी आहे हे जाणले पाहिजे. ईश्वरस्वरूप हे अविनाशी आहे. परमात्मा हा अविनाशी आहे. जीवाला जोपर्यंत देहाभिमान सुटलेला नाही तोपर्यंत तो विनाशी आहे. पुन्हा मृत्यू आहे, पुन्हा जन्म आहे. तो समजतो आहे म्हणून आहे. मला मृत्यू येणार आहे हे तो समजतोय म्हणून तो आहे.

पण शुद्ध मी कोण आहे हे जर त्याला कळून आले तर तोही तसाच आहे. देह अनित्य आहे. देहामध्ये राहाणारा जीवात्मा नित्य आहे. आरंभालाच हा उपदेश अर्जुनाला भगवंतांनी हा उपदेश केलेला आहे. भगवान म्हणाले, अनेक जन्म जीवाचे जातात पण जीव नष्ट होत नाही. घेतलेले शरीर सोडणे म्हणजे मृत्यू आहे. नवीन शरीर धारण करणे म्हणजे जन्म आहे. मृत्यू कायमच आहे. ही जाणीव अगोदरच त्याला करून दिलेली आहे. आणि मग ईश्वरस्वरुप कसे आहे, विश्वव्यापी कसे आहे हे विश्वरुप दाखवले त्याला.

म्हणून ईश्वर अविनाशी आहे ही उपासकाच्या मनामध्ये भावना पाहिजे. आपल्याला अज्ञानाने मृत्यू येणार,

आपला नाश होणार असे जे वाटते, कारण देहालाच तो 'मी'समजतो. देहाला मृत्यू ठरलेलाच आहे. देहाबरोबर मलाहि मृत्यू आहे कारण देह म्हणजेच मी आहे. असं जरी तो समजत असला तरी आपला उद्धार करणारा ईश्वर मात्र अविनाशी आहे म्हणून तो सर्वांचा गुरू होऊ शकतो. आणि हे ज्ञान झाल्यानंतर उपासनाही दृढ होते आहे. तर याप्रमाणे अखंड आत्मा अविनाशी दत्त। तया पदी लाविती जे स्वचित्त। हे एक ज्ञानी महात्म्यांचे, सज्जनांचे, सद्गुरूंचे लक्षण त्यांनी सांगितले आहे.

त्यांच्या मनामध्ये अखंड परमात्मरुप आहे. सगुण निर्गुण कोणतहि दत्तरूप का होईना ते त्यांच्या मनामध्ये आहे. सगुणहि तोच आहे. आणि निर्गुणहि तोच आहे. आणि दुसरी बाजू त्यांनी दाखविली आहे— वित्त भ्रमा सोडिती ते कृतार्थ। हा जो संपूर्ण भ्रम आहे— संसार भ्रम ज्याला आपण म्हणतो तो त्यांच्या दृष्टीने भ्रम आहे. आपल्याला तो भ्रम वाटत नाही. आपल्याला तो सगळा खराच वाटतो. तसे संस्कार अनेक जन्मापासून आमच्याकडे आलेले आहेत, आमच्या बुद्धीवर झालेले आहेत. तर संसार सत्य आहे, सगळीहि सुख दुःख वगैरे खरी आहेत. असेनात. पण ही सगळी दुःखं घालवणारा सगळी सुख देणारा ईश्वर मात्र अविनाशी आहे. ही बुद्धी जर कायम असेल तरी कल्याण आहे.

पण हा सर्वही भ्रम आहे. हा भ्रम ज्यांच्या मनातून पूर्ण गेलेला आहे. ही एक दुसरी बाजू दाखिवली आहे. हा दोष नाही आणि ईश्वराच्या ठिकाणी अखंड चित्त लागलेलं आहे, मन स्थिर झालेलं आहे. झोपसुद्धा नाही. समाधीचा अभ्यास करणारे जे महात्मे आहेत त्यांना झोप कुठली लागणार! आहार विहाराकडे लक्ष नाही. कांय आवश्यक असेलं तेवढं करायचे. आणखी अखंड अनुसंधान करायचं. संन्यास आश्रम तेवढ्यासाठी सांगितलाय ना! सगळ्याही व्यापातून ज्यांच मन बाजूला झालं आहे. त्याग सगळ्याचा ज्यांनी केला आहे मनातून. बाहेरून त्याग नाही. त्याला त्याग म्हणत नाहीत. त्यांनी दुसर काहीही करायचं नाही फक्त ईश्वराचे अनुसंधान करायचे आहे. निर्गुणाचे किंवा सगुणाचे. एकच रूप आहे. सद्गुरूंचे अनुसंधान केलं तरी हरकत नाही. ईश्वराच्या ज्या अनेक लीला झाल्यात त्यांच अनुसंधान झालं तरी हरकत नाही. पण दुसरा विषय नाही.

तेव्हां मनाला दुसरा विषय नसणे ही जी मनाची स्थिती त्यांनी बदलून टाकली आहे त्याला किती प्रयत्न करायला लागला असेल? ईश्वर स्वरुपाच्या ठिकाणी त्यांचे मन इतके स्थिर झाले आहे म्हणून त्यांच्या जवळ गेल्या नंतर दुसऱ्या गोष्टीच नसतात. त्यांच्याकडून नेहमी पारमार्थिक गोष्टी आपल्याला ऐकायला मिळतात. आणि त्यामुळे आपल्या मनावरही परिणाम होतो.

संसारही आहे मनामध्ये आणि ईश्वराच अनुसंधानही आहे, असं दोन्ही होऊ शकत नाही. ईश्वराचे अनुसंधान जरी असले तरी ते सकाम असणार आहे. सांसारिक सुखाकडे अधिक लक्ष लागलेले आहे. आणि त्या प्रमाणे सगळी सुख आपल्याला मिळावीत म्हणून ईश्वराकडे लक्ष लागलंय.तोहि दोष आहे म्हणून त्यांनी दोन विभाग केले. संपूर्ण संसार, धन म्हणून जे आहे ते त्यांच्या मनातून पूर्णपणे गेले आहे. काही नाही. ह्याच्याकडे लक्षच नाही आहे. राहिले काय आणि नाही राहिले काय. ''ठेविले अनंते तैसेची रहावे'' हा एक त्यांचा मोठा गुण आहे.

सांसारिक दृष्टीने हा अभ्यास आहे आणि परमेश्वर चिंतनामध्ये अनन्य झालेत ना ते. अन्य सगळ मनातलं काढून टाकून ईश्वराचे चिंतन करता येते. दुसरा कोणताही विचार मनात न आणता ईश्वराच्या निर्गुण स्वरुपाचे चिंतन अखंड चालू आहे. त्याचे सामर्थ्य किती असेल! ईश्वर निरंतर मनामध्ये आल्यानंतर ईश्वराला अवतार घ्यावा लागतो ना!

प्रल्हादजींनी काही मागितले नव्हते. सगळ सहन करीत होते ते. नाथमहाराजही सगळ सहन करीत होते. ज्ञानी महात्म्यांची तितिक्षा मोठी असते. आणि त्या तितिक्षेचा परिणाम असतो. परमेश्वराला कशाचाच अभिमान नाही.

अत्यंत अलिप्त ईश्वरस्वरुप आहे. शंकराचार्य महाराजांनी ईश्वराला पावसाची उपमा दिली आहे. पर्जन्याप्रमाणे ईश्वर आहे. त्याला काही दोष द्यायचे कारण नाही. उत्तम जमिनीमध्ये पाऊस पडला तर उत्तम पीक येईल. खडकावर पडला, समुद्रात पडला तर फुकट जाईल. तो दोष काय त्या पावसाचा आहे काय! जमीन कशी आहे. कोणच्या जमिनीत तो पाऊस पडलाय त्या जमिनीचा तो गुण आहे. पाऊस हा काही त्याला उपकरण नाही.

अनुकूल आणि प्रतिकूल या दृष्टीने परमात्मा अलिप्त आहे. ज्याने ज्याने जशी कर्म केलीत त्याला त्याला तशी फळे देऊन मोकळा. पुन्हा काही नाही. कोणचाहि पक्ष नाही, काही नाही. अशी स्थिती असताना सुद्धा प्रल्हादाला जिवंत ठेवले पाहिजे अशी बुद्धी का व्हावी ईश्वराला? अलिप्त अशी बुद्धि असताना फक्त सृष्टीच कार्य चाललं आले. जीवांच्या कर्माप्रमाणेच चाललेले आहे. त्याचे सुद्धा स्वतःकडे कर्तृत्व घेत नाहीत म्हणे. सृष्टी निर्माण करताना जीवांची कर्म त्याने लक्षात घेतली आहेत. त्या कर्मांप्रमाणे सृष्टी विषम झाली आहे. आणि त्याची फलही देण्याचे कार्य चालू आहे.

पण अशी स्थिती असतानासुद्धा प्रल्हादजींचा अभिमान का धारण केला? त्याला जिवंत ठेवण्याकरता भगवान् स्वतंत्र नरसिंहाचा अवतार घेऊन आले. हिरण्यकश्यपूने त्रैलोक्याची सत्ता मिळवली आहे. तपश्चर्या केलेली आहे. पण वृत्ती बदलली नाही. तपश्चर्या करून ब्रम्हदेवांकडून वर मिळवला आणि त्रैलोक्याची सर्व सत्ता ताब्यामध्ये आणलेली आहे. पण तो स्वतःला ईश्वर समजतोय. प्रल्हादजी स्वतःला ईश्वर समजत नाहीत असेल. तत्वज्ञानाच्या दृष्टीने ती भूमिका असेल. पण उपासकाच्या भूमिकेमध्ये जे प्रल्हादजी आहेत ते भक्त म्हणूनच राहिले.

मारूतिरायांनी रामचंद्रांना सांगितले देहदृष्ट्या दासोऽहम् . मी देहदृष्टीने तुमचा दास आहे. तुमच्या आज्ञेच पालन करणं माझं कर्तव्य आहे. जीवदृष्ट्या तुमचा अंश आहे. या देहामध्ये राहाणारा मी जीवात्मा आहे असे जेव्हा वाटतं त्यावेळेला मी तुमचा अंश आहे. पण तुम्ही किती मोठे आहात मी अंश तो केवढा! समुद्राच्या लाटेबद्दल बोलायचे झाले तर लाट ही केवढी असणार! समुद्र केवढा असणार!म्हणजे जीवदृष्ट्या तुमचा अंश मी अविनाशी असलो तरी लहान आहे. आणि आत्मदृष्टी झाली की 'मी'हि गेला. वासुदेवः सर्वम्. सगळाच ईश्वररुप आहे— ज्ञान भूमिकेवर गेलेल्याला.

परंतु भक्तांची जी भूमिका आहे त्या भूमिकेवर असणारे जे महान भक्त आहेत ते मात्र भक्तच राहातात. दासोऽहम्! प्रल्हादजींनी तुमची मला दास्यभक्ती द्या. अस मागून घेतलं शेवटी. सेवा करायला.

भगवान् सदाशिवांनी सुद्धा असा विचार केला आहे. विष्णूंचे भक्त शंकर म्हणजे. देवाची म्हणजे रामचंद्रांची सेवा करायची आहे म्हणाले. कोणच्या रुपाने सेवा करावी? त्यांनी हे वानराचे रुप पसंत केले. कुठेही झाडाची फळे मिळतील ती खावीत, पाणी प्यावे नदीचे आणि सेवा करावी पगार वाढ करा, अमूक करा, संप करा, काही प्रश्न नाही. मालकाला काहीही त्रास नाही. नुसती अखंड सेवा घडली पाहिजे. देवाकडून काही घ्यायचे नाही. सेवा फक्त करायची . त्यामुळे आपण या दास्यभक्तिमध्येच राहावे असे त्यांना वाटले. ज्ञानी भक्त झालेले शुकाचार्य महाराजांच्या सारखे सुद्धा भागवताचे अखंड अनुसंधान करताहेत. भगवान् श्रीहरींच्या लीलांचे अनुसंधान त्यांचे अखंड चाललंय. त्यांना त्या निर्गुण निराकार आत्मज्ञान समाधीमध्ये राहाता येणार नाही असे नाही.

तर ही जी भक्ती आहे ईश्वराची किंवा जे ईश्वर स्वरूप सद्गुरू आहेत, ज्यांनी ईश्वरस्वरुप जाणलेले आहे आणि अंतःकरण आपलं त्या ठिकाणी स्थिर केलेले आहे. अशा प्रकारचे जे महात्मे आहेत आणि ज्यांच्या मनातला संसार भ्रम सगळा दूर झालेला आहे. "वित्तभ्रमा" हा शद्ब घातलाय महाराजांनी. वित्त म्हणजे द्रव्य. धन ज्याला आपण म्हणतो. शास्त्रकारांनी दोन विभाग त्याच्यामध्ये केलेले आहेत. —शेतीवाडी, घरदार, द्रव्य हे सगळं मानुष वित्त. आणि दैववित्त म्हणून एक आहे. देवाने दिलेलं वित्त म्हणजे उपासना. हे ज्याने मिळवलेलं आहे. मानुषवित्ताकडे

लक्ष ठेवलेलं नाही. दैवी वित्ताची उपासना करण्याकडे अखंड लक्ष लागत आहे. आणि ती उपासना ज्यांची पक्की झालेली आहे. उपासना पक्की होणं याचा अर्थ त्याचा भ्रम गेला पाहिजे. मी उपासना करतो आहे अशी कर्तृत्व - भावना नाहीशी झाली पाहिजे. सद्गुरूंची उपासना असो किंवा ईश्वराची उपासना असो एकच आहेत ते दोघेही. उपासनेचे कर्तृत्व जोपर्यंत मनामध्ये आहे तोपर्यंत उद्धार नाही. मी उपासना करणारा आहे असे जर वाटत असेल तर त्यामुळेही आणखी अधःपात होतो.

भागवतामध्ये जयविजयांची कथा आलेली आहे. भगवान् विष्णुंचे द्वारपाल दोघे होते. अगदी विष्णुंसारखं रुप. सरुपता होती. विष्णुलोकात कुठे तरी राहिले असे नाही. विष्णूंचे ज्या ठिकाणी स्थान आहे तिथे दारावर आहेत. आणि त्यांच्या प्रमाणेच रुप आहे. इतक्या उच्च गतीला पोहोचलेले अशा प्रकारचे जयविजय पण त्यांच्याहि अंत:करणामध्ये जो अभिमान होता म्हणा किंवा मनाकडे इतके लक्ष त्यांनी दिले नाही. ब्रम्हदेवांचे मानसपुत्र सनंदन सनत कुमार बाल वेषामध्ये तिथे आले. पहिल्यापासून बालरुपच त्यांचे आहे म्हणतात.

काळाने शरीरामध्ये जास्ती जास्ती परिणाम होतो रूपांतर होत जातं. लहान असलेल शरीर मोठ होतं. तरूण असलेल शरीर वृद्ध होतं. शरीराचे रुपांतर होणे, शरीरावर परिणाम होणे हे काळाचे कार्य आहे. कोणीहि असो. वृद्धावस्था ही येणारच त्या शरीराला. पण यांना तसं नाही. पांच वर्षांचे कायम आहेत. ज्ञानी महात्मे. अनेक जन्मांचं आणखी सुकृत आहे त्यांचं. पूर्ण ज्ञान मिळालेलं आहे. शक्ति मिळालेली आहे. आपल शरीर वाटेल तस ते ठेवू शकतात. त्यामुळे लहान मुल आलेली आहेत. देवाच्या दर्शनाला जाणार आहेत पण दारावर असलेल्या जय विजयांनी त्यांना आत जायच नाही म्हणून सांगितलं. ब्रम्हलोकातून आले होते ते, ज्ञानी महात्मे होते. पण बाह्यरुपाला पाहून जय विजयांना वाटलं ही लहान मुलं आहेत. विष्णूंच्या रुपामध्ये असलेले ते द्वारपाल. सरूपता मुक्ती ज्यांना मिळाली आहे. रोज ज्यांना विष्णूंच दर्शन होत पण त्यांना ह्या लहान मुलांची काही ओळख पटली नाही. त्यांनी ह्यांना सांगितल. तुम्ही जायला योग्य नाही आहात.

भगवंताच्या प्रेरणेनेच सगळ झाल. बुद्धि सुधारणा व्हायला पाहिजे ना! रावणादिक अधर्माच्या मार्गाने गेले त्यांची सुधारणा झाली नाही. हे जय विजय भक्तीच्या मार्गाने गेले तरी सुद्धा त्यांच्या बुद्धीची सुधारणा झाली नाही. या सृष्टीमध्ये ईश्वराची लीला चालू आहे. रामावतारामध्ये शेवटी सर्व अयोध्यावासी लोकांना घेऊन रामराय निजधामास गेले. कृष्णावतारामध्ये अनेक असुरांचा नाश केला, सज्जनांच संरक्षण केलं आणि शेवटी त्या यादवांचा नाश करून गेले. हे म्हणाले, पुढं चालू राहाणार. चांगली भूमिका मिळालेली आहे पण ती टिकली पाहिजे ना! मानसिक दृष्टी त्यांची नाही. मनाची सुधारणा करण्याकडे त्यांची दृष्टी नाही. त्यामुळे ते (जय विजय) जरी आपले भक्त असले तरी त्यांची सुधारणा झाली पाहिजे. सुधारणा म्हणजे पुढच्या कोणत्याहि जन्मात त्या सर्व यादवांचा नाश करून ते गेले. दोन्ही कार्ये चालू आहेत.

तर ते चौघे ब्रम्हज्ञानी महात्मे विष्णु दर्शन करायला आलेले आहेत. सगुण भक्तिही मनामध्ये पुष्कळ आहे. निर्गुण श्रेष्ठ आणि सगुण कमी अशा प्रकारची भावना मनामध्ये नाहीये. ते काय, ज्ञानेश्वर महाराज काय. इकडे यांना प्रतिबंध झाल्यावर त्यांनी जय विजयांना सांगितलं, तुम्ही इथे राहू शकत नाही. विष्णूलोकामध्ये राहायला तुम्ही अपात्र आहात. परस्पर व्यवस्था झाली. त्यांचे काही प्रसंग पाहिले असतील विष्णूंनी. पूर्वी एका लक्ष्मीदेवीला सुद्धा अडवलं होत जय विजयांनी, तिनेही शाप दिला होता.

"तर वित्त भ्रमा सोडिती ते कृतार्थ" याच्या बद्दल हा प्रसंग चाललेला आहे. मी उपासना करणारा आहे, मोठा भक्त आहे हा भ्रम आहे. प्रल्हादजींच्या सांगण्याप्रमाणे, मी भक्ती करत नाही, पिताजी. आपल्या गुरुजींनाही त्यांनी सांगितल, मी भक्ती करत नाही, गुरूजी. हृदयस्थ जो श्रीहरी परमात्मा आहे त्याच्या इच्छेने भजन चाललेलं

आहे. मी काहीही करत नाही. हे ज्ञानच आहे. भक्ताच्या भूमिकेवर असून सुद्धा ज्ञानी आहेत. कर्तृत्व आपलं नाही म्हणतात.

तुम्ही या ठिकाणी राहू शकत नाही. ज्ञानी महात्मे आहेत.' शाद्ब परेच निण्णातम्' म्हणजे शद्बातही सामर्थ्य आहे. आशीर्वाद देतील तर तोही मोठा आहे. म्हशीला दूध नाही ती बाई म्हणते आहे, नुसती बांधली आहे. तिला दूध येत नाही. पण हे (नरसिंह सरस्वती) म्हणतात. अहो ती दूध देणारी म्हैस आहे. महात्म्यांचा शद्ब आहे. ती जर हट्टानी म्हणाली असती, "नाही देत म्हैस दूध. तुम्ही काय सांगता!" तर महाराज निघून गेले असते. पण तो महात्मा सांगतो आहे. म्हणून तो गेली म्हशीजवळ आणि दूध मिळालं. अशीहि शद्बामध्ये शक्ती आहे.

मनातले सगळे विकार जर दूर करता आले आणि मनामध्ये अखंड परमात्म्याचे अनुसंधान जर चालू झालं तर ह्या मनाची अशी शक्ति निर्माण होते. जो संकल्प होईल त्या प्रमाणे कार्य घडते. जो शद्ब निघेल त्या प्रमाणे कार्य होतय. ती शक्ती आम्हाला नाहीये म्हणून सगळ खोटं आम्हाला वाटतं, असं घडूच शकत नाही असं आम्ही म्हणतो आणि बाजूला राहातो. खर आहे असं जरी वाटलं तरी प्रयत्नाला आम्ही लागू.

विष्णु लोकामध्ये राहण्याला तुम्ही अपात्र आहात. हे जे मनोविकार तुमचे आहेत — हा अमूक आहे याला आत सोडायचे नाही वगैरे - ते विकार ज्या लोकांमध्ये आहेत, त्या मृत्यु लोकांमध्ये तुम्ही जाल. भगवान् महाविष्णु आले बाहेर. त्यांनी सनत्कुमारांना सांगितलं तुम्ही दिलेल्या शापाला माझी मान्यता आहे. तुमच्या मुखातून निघालेल्या वाणी प्रमाणे होईल. तीन जन्मानंतर हे परत या ठिकाणी येतील अस त्यांना सांगा, म्हणाले. आता ते दोघेहि जय विजय ऐकताहेत तिथे. त्यांनी विचार केला आपल्या हातून अपराध घडलेला आहे. त्यांना आपण अडवलं, ते महात्मे आहेत, ज्ञानी आहेत, त्यांना आपण ओळखलं नाही अणि त्यांना पुन्हा प्रतिबंध केला दर्शनाला. ह्या स्वतःच्या दोषाकडे लक्ष नाही. आम्ही मोठे भक्त आहोत देवाचे. द्वारपाल आहोत. केवढा मोठा अधिकार दिला आम्हांला. ही अहंकाराची भावना मनामध्ये आहे. ह्या अहंकारामुळे, कर्तृत्वाभिमानामुळे त्यांचा जेव्हा अधःपात झाला त्यावेळेला त्यांच्या मनामध्ये असे विचार आले, असं सांगतात कि, या विष्णूची आम्ही इतकी सेवा केली तरी शेवटी त्यांनी आमच्यासाठी काहीच केलं नाही!

विरोधी वृत्ती उत्पन्न झाल्यामुळे ते दैत्य झाले. जाताना, पडताना जरी त्यांनी म्हटल असत. देवाने आमच्यावर कृपा करावी तर निदान चांगल्या जन्माला आले असते. पण हिरण्याक्ष आणि हिरण्यकश्यपू का झाले तर खाली पडताना त्यांच्या मनात आलं देवाची आम्ही इतकी सेवा केली असताना देवाने आमच्यासाठी काहीच केलं नाही? केवढं नुकसान झालं!

तिथून ते खाली आले मृत्यु लोकावर. पण इथे आल्यावर त्यांच्या बुद्धीवरचे ते भक्तीचे. सगळे संस्कार नाहीसे झाले. हरीचा द्वेष तीन जन्म त्यांनी केला. केवढं नुकसान झालं. संतांचा अपमान करण आणि स्वतःच्या उपासनेचा अभिमान धारण करणं यामुळे त्यांना मृत्यु लोकावर यावे लागले.

## वित्तभ्रमा सोडिती ते कृतार्थ।

हा भ्रम गेला. प्रार्थना उपासना एक दैव - वित्त आहे. उपासना ही दैवी संपत्ती आहे. त्या उपासना मार्गाला आपण लागलेलो आहोत. परंतु त्या ईश्वराची कृपा आहे ती. त्या सद्गुरूची कृपा आहे म्हणून ही गुरुभक्ती घडते आहे. म्हणून त्या ईश्वराची उपासनाभक्ती आपल्या हातून घडती आहे. ही बुद्धी अंतःकरणामध्ये निरंतर ठेवून जर उपासना

झाली तर त्यांना तो दोष लागत नाही. अहंकार उत्पन्न होत नाही ना!

म्हणून हा एक त्यांचा मोठा गुण सांगितला आहे—

**तो पूर्ण आनंद गुरू समर्थ।**

पूर्ण आनंदरुप ते झालेले आहेत. त्यांनी सर्व वित्तभ्रम सोडलेला आहे. संसाराची उपेक्षा केलेली आहे. संसारातून मन बाजूला काढून घेतलेलं आहे. ते ईश्वर स्वरुपाच्या ठिकाणी लावलेलं आहे. ईश्वर एक आहे, ही भावना आहे मनामध्ये. त्यामुळे शत्रुमित्र ही भावनाच नाहीये. म्हणून कोणीही, कितीही, कसाही त्रास दिला तरी त्यांच्या मनावर परिणाम होत नाही ना! राग यायचा नाही म्हणून काही राग यायचा थांबत नाही. अहंकार जोपर्यंत अंतःकरणामध्ये आहे तोपर्यंत रागद्वेषादि विकार मनामध्ये राहाणारच. अहंकारामुळे संसारहि होतो. अहंकारामुळेच परमार्थहि होतो. इथे अहंकार म्हणजे शुद्ध अहंकार आहे. याच मार्गाने मला जायचंय. तो मार्ग मला नाही घ्यायचा. विरक्त महात्मे संसार टाकून जाताहेत.

तुलसीदासजी संसारीच होते. एक रात्र देखील बायकोला माहेरीसुद्धा पाठवायचे नाही. पण पूर्वीच्या सुकृताचे फळ मिळायची वेळ आली. बायकोच्याच वाक्याने आणखी त्यांच मन एकदम बदलल आहे. ती म्हणाली या रक्त मांसाच्या शरीरावर तुम्ही आणखी तुमच चित्त ठेवता! तेच जर त्या आत्मारामाच्या ठिकाणी ठेवलत तर तुमचा उद्धार होईल.

जर महात्म्यांची कृपा झाली तर संसार बाजूला होतो. संसार मनातून जाणे शक्य आहे. आणि मग ईश्वराच्या ठिकाणी चित्त स्थिर होते. ती सगळी जबाबदारी घेण्याची शक्ती आणि योग्यता सद्‌गुरूंच्या ठिकाणी आहे. असे दोन प्रकार त्यांनी दाखवले. ईश्वरस्वरुपाच्या ठिकाणी बुद्धि स्थिर झाली आहे. मन दुसरीकडे जातच नाही. संसार बुद्धीतला सगळा मावळलेला आहे. ज्ञानेश्वर महाराज एका ओवीत म्हणतात विश्वाभास सगळा मावळून गेलेला आहे.

तो आत्मसूर्य परमात्मा चित्तामध्ये प्रगट झाला आहे. आणि पूर्ण आनंदरुप ते झालेले आहेत. तेच कृतार्थ झालेले आहेत. काय मिळवायच ते त्यांनी मिळवलेलं आहे. ते सगळ्या समाजातल्या जीवांच कल्याण करू शकतात.

इतरांना तशी योग्यताच नाहीये. स्वतःचीच सुधारणा झालेली नाही. मनामध्ये भगवंताबद्दल प्रेम नाही, अंतःकरणात अनेक दोष भरलेले आहेत, तिथे दुसऱ्याला काय शिकवणार. म्हणून ही योग्यता त्या ज्ञानी महात्म्यांच्या ठिकाणी, सद्‌गुरूंच्या ठिकाणी असते. ईश्वरस्वरूप सद्‌गुरूंची भेट होण्याला सुद्धा आरंभाला ईश्वराला शरण जाव लागत. भगवद्-भक्तीची आवश्यकता असते. कर्मानुष्ठान व्हावं लागतं. म्हणून पहिल्यापासून गुरू आणि भक्ती बरोबरच आहेत.

आपल्याला शास्त्राने सांगितलेली कर्म करायची आपण. पण त्याच्या बरोबर ईश्वराची उपासनाहि घडली पाहिजे. ईश्वराची अनेक प्रकारची ध्यानेहि भगवंतांनी गीतेत सांगितली आहेत. विष्णूंच ध्यान काय आहे, शंकरांच ध्यान काय आहे. ज्या ज्या देवतेबद्दल आपल्याला मनापासून प्रेम वाटत असेल त्या त्या देवतेच्या ठिकाणी आपलं मन स्थिर करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. उपासना मार्ग पहिल्यापासून चालू पाहिजे. कर्मानुष्ठान झाल्यानंतर उपासना आहे. अगोदर नाही अस नाही. कर्मामध्ये शुद्धी ही ईश्वराच्या कृपेने होते. ती उपासना जशी अधिक अधिक वाढत जाईल तस तस मन शुद्ध होत जाईल. तस तस ईश्वररुप उपासक होऊ शकतो. ईश्वररुप होणं, उपास्य रूप होण ही उपासनेची शेवटची मर्यादा सांगितली आहे. त्याच ध्यान करता करता तद्रूप होऊन जाण.

शंकराचार्यांचे शिष्य पद्मपादाचार्य, नरसिंहांचे मोठे उपासक होते. नरसिंहांचे ध्यान करता करता शेवटी नरसिंहरुप होऊन जायचे. पद्मपादाचार्य नाहीतच तिथे नरसिंहच दिसायला लागायचे अशी उपासना आहे. हा ध्यानाचा परिपाक आहे. शुद्ध अंतःकरणाने अहंकार, राग, द्वेष, मल रहित अंतःकरण झाल्यानंतर, ध्यानाला सुरवात झाली म्हणजे त्या ध्यानामध्ये प्रगती होते. आणि अशा त्या ध्यानाने मनाची, बुद्धीची स्थिरता होता होता त्याचा परिपाक म्हणजे समाधी आहे. मनाची जास्ती स्थिरता म्हणजे समाधी आहे.

पूर्वावस्थेमध्ये त्याच मनाला ध्यानस्थ महिमनः असे म्हणतात. ते अत्यंत स्थिर झाल्यावर त्याला समाधि अवस्था म्हणतात. ह्या सगळ्याहि अवस्था ईश्वराच्या कृपेने प्राप्त होतात. ईश्वराच्याच कृपेने ईश्वररुप झालेले पण आपल्याप्रमाणेच मानवरुप धारण करून आलेल्या ज्ञानी महात्म्यांची गांठभेट होते. त्यांच्याबद्दल आपल्या मनामध्ये श्रद्धाहि निर्माण होते. तीही पाहिजे. जरी ज्ञानी महत्मे आपल्याला भेटले तरी त्यांना ओळखता आले पाहिजे. सनतकुमारांना जयविजयांनी ओळखले नाही. त्यांच्या सांगण्यावर विश्वास बसला पाहिजे, श्रद्धा बसली पाहिजे. त्यांच्या आज्ञे प्रमाणे वागून साधनाभ्यास चालू असताना मनाची प्रगती कशी कशी होत जाते ते पाहिले पाहिजे. त्यांच्या कृपेने आश्चर्यकारक प्रगती होऊ शकते.

म्हणून या श्लोकामध्ये महाराजांनी सद्गुरूंच स्वरुप सांगितले आहे. संसाराची ते पूर्ण उपेक्षा करतात. संसाराचा विचार बिलकुल त्यांच्या मनात येत नाही. हैद्राबादला भटजीबापू म्हणून एक महाराज होते म्हणतात. मोठे शिवभक्त होते आणि उत्तम गवई होते. शंकरांच पार्थिव लिंग करायचं, त्याची पूजा करायची आणि मग गाण्याला सुरवात करायची. समाधि अवस्थाच ती. कोणीही आला गेला. त्याला जेवायला घालायच, त्याचा आदर सत्कार करायचा. एकुलता एक मुलगा होता तोहि गेला, त्यांचा काही परिणाम नाही. "त्याचा इतकाच संबंध होता गेला," म्हणाले.

त्या वेळेला विदर्भातून कोणी मंडळी त्यांच गाणं ऐकण्यासाठी हैद्राबादला आली. त्या मुलाला न्यायची तयारी चाललेली होती. हे स्वस्थ बसले होते. तयारी झाली की जायचं. कारण ह्यांच्या हातूनच पुढचे संस्कार होणार. ती मंडळी म्हणाली, महाराज आम्ही आपल गाण ऐकण्या करता आलोय. हे म्हणाले, बरय, तंबोरा आणतो. आणि म्हणायला लागले.

मनामध्ये जर संसार असता तर शक्य आहे का? किती शोक झाला असता? राग आला असता. या वेळेला गाण ऐकता काय तुम्ही! पण नाही. संसार नाहीच मनामध्ये. मग मुलगा राहिला काय आणि गेला काय.

तर ही अत्यंत मोठी विलक्षण कृती आहे. उदासीन अवस्था आहे पुन्हा ईश्वराच्या ठिकाणी तितकीच तन्मयताहि आहे. दोन्ही आहे. आणि अशा दोन्हीही अवस्थेमध्ये असणारे महात्मेच जगाच कल्याण करू शकतात. पूर्ण शक्तिहि त्यांच्या जवळ आहे. अशी संतांची उदाहरणे आपण ऐकतो. पूर्वीच्या काळामध्ये यवनांनी पुष्कळ त्रास दिला आहे. अनेक मंदिरांची नासधूस केली. पण या संतांनी आपल्या भगवद् भक्तीच्या प्रभावाने हा वैदिक धर्म टिकविला आहे. अस्तिक्य बुद्धि सर्वांच्या मनामध्ये पक्की केलेली आहे. उद्धार होण्याला काळ लागला असेल. संसार मनातून जायचा म्हणजे काही काळ लागणार नाही का! शक्य आहे का. लगेच संसार मनातला जाईल कसा?

आपण अविनाशी आहोत. पहिली जाणीव भगवंतांनी करून दिली आहे. तू अविनाशी आहेस. जीव जरी असला तरी तो अविनाशी आहे. अनादि आहे, अनंत आहे. ही पक्की जाणीव ठेवून उपासना करायची. हा जन्म गेला तर पुढचा जन्म आहे.

तर हे सगळे उपाय निरनिराळ्या प्रकारचा उपदेश सद्गुरुंच्याकडून आपल्याला ऐकायला मिळतो आणि त्यामुळे मनामध्ये येणारे सगळे संशय दूर होतात. रमण महर्षींच्याकडे विचारायला गेलेल्या युरोपियन गृहस्थांच्या (पॉल ब्रंटन) मनातले सगळे संशय गेले ना! त्यांच्या नुसत्या दृष्टीनेच संशयाची निवृत्ती होती. इतकं सामर्थ्य त्यांचं आहे.

म्हणजे ईश्वराचं साक्षात स्वरुपच आहे. ज्ञानी महात्मा म्हणजे. भगवान् सांगतात. ज्ञानी महात्मा हा माझं स्वरुप आहे.

तेव्हा अशी अशी आपल्याला सद्गुरुंची भक्ती उत्पन्न व्हावी. भक्तीतहि पुष्कळ प्रकार आहेत. प्रतिबंधहि पुष्कळ येतात. ते कसे दूर करायचे काय करायचे हे सगळ ते समजावून सांगतायत आणि तशी गुरुभक्ति जर साधकाच्या कडून घडली तर मग मात्र परमार्थ मार्गामध्ये उत्तम प्रगती होवून आत्मज्ञानाच्या जास्त जास्त जवळ जातो. ईश्वराच पूर्ण दर्शन त्याला त्या अभ्यासाने होत. साधनाभ्यासाने पूर्ण ईश्वरदर्शन झाल्यावर तो कृतार्थ होतो आहे.

या ठिकाणी सद्गुरुंचा उत्सव चालू आहे. पुष्कळ मंडळी येऊन नाम स्मरण वगैरे करत असतात. निरनिराळ्या प्रकारचे कार्यक्रम होतात. वर्षातून काही काळ का होईना अशा प्रकारच्या महात्म्यांचे आपल्याकडून अनुसंधान घडाव. आपल्याला मनाची, बुद्धिची तयारी कशी करायची आहे हे समजून येण्याकरता तरी हे चिंतन घडल पाहिजे. त्यांच मन कस झालेल आहे. केवढ तरी ऐकल. तरी तेवढ आपलं मन कस होईल? संसाराबद्दल पूर्ण उपेक्षा, संसार नाहीच मनात. मुलगा गेला तरी नाही, असला तरी नाही. आणि ते मोकळ झालेलं मन ईश्वराच्या ठिकाणी स्थिर होत. ते पुन्हा संसाराकडे येत नाही. हा एक मोठा चमत्कार आहे. त्यांची उपेक्षा बुद्धी इतकी झालेली आहे की संसाराबद्दल काही नाही. इतकी विरक्ती आहे.

विरक्तीचेसुद्धा पुष्कळ प्रकार आहेत. शास्त्रकारांनी, महात्म्यांनी पुष्कळ सांगून ठेवलं आहे. त्याचे जेवढं चिंतन होईल तेवढ करायच. परमात्म्याच्या ठिकाणी मन स्थिर करण आणि संसारातून मन बाजूला काढण ही दोनच साधन आहेत. या दोन साधनांनीच आणखी सगळ कल्याण होत असत. ही दोन साधन उत्पन्न होण्याकरता मात्र सहाय्याची जरूरी आहे. सद्गुरूंच सहाय्य पाहिजे. ईश्वरभक्ती गुरूभक्ती म्हणून पाहिजे. वैदिक धर्मामध्ये याला फार महत्त्व दिलं गेलं आहे. सर्वहि भक्तीचे अधिकारी आहेत. त्यात अधिकार अनधिकार हा विचार नाही. ईश्वराची उपासना, सद्गुरुंची उपासना आबाल वृद्धात सगळ्यानाही करता येते.

पण आत्मकल्याण करून घ्यायचंय इकडे दृष्टी पाहिजे. **अहंकार त्याच्याबद्दल उत्पन्न होऊन उपयोगी नाही. अहंकार उत्पन्न झाला की उपासकांमध्ये सुद्धा भांडण, कलह, द्वेष उत्पन्न होतो. म्हणून वैयक्तिक आपल कल्याण झाल पाहिजे.** हे आपल पक्क ध्येय ठरवून त्या प्रमाणे प्रयत्न सुरू केला असता अशा प्रकारची ईश्वराची योजना आहे की असे अनेक महात्मे ईश्वराच्या, प्रेरणेने कार्य करताहेत.

कुठे कोणचे महात्मे कार्य करताहेत आपल्याला माहीतपण नाही. काय कार्य चाललय काही आपल्याला समजून येत नाही. पण जग ज्याने निर्माण केल त्याला जगाची काळजी असणार ना! आपण अनेक व्याख्याने, सभा, संमेलने करतो पण त्याचा उपयोग काही होत नाही. सुधारणा कोणाची होतेय?

त्या करता **जगाला निर्माण करणारा जो आहे तो खरा मालक** आहे. **बंगला** ज्याने **बांधला** त्याच्या **डागडूजीकडे लक्ष देण त्याला भागच आहे ना!** त्या प्रमाणे ईश्वराचे लक्ष असते. त्याच्या आज्ञेप्रमाणे आपण वागण्याचा प्रयत्न करायचा आहे. त्याच्या प्रेरणेप्रमाणे कार्य करणाऱ्या महात्म्यांवर विश्वास ठेवून ते ज्या मार्गाने गेले तो मार्ग आपल्याला मिळावा अशी ईश्वराजवळ प्रार्थना करायची आहे. या उत्सवाच्या वेळी एवढीच प्रार्थना करून ही यथा मती वाङमय सेवा उत्सवाच्या निमित्ताने घडली आहे. ती सद्गुरू महाराजांच्या चरणी अर्पण करतो.

**अवधूत चिंतन श्री गुरूदेवदत्त।।**

# सोहळा वर्णन

ब्रह्मज्ञानी तपोनिधीला, त्रिवार हे वंदन ।
आज होतसे भव्य सोहळा, सहस्रशशी दर्शन ।।

दत्तगुरुंच्या जयघोषाने, निवास दुमदुमला
भक्तवृंद हा धुंद होऊनी, अमृतात न्हाला
''लक्ष्मी'' संगे दत्तराज हे, नमिती गुरुचरण
गुरुस्मृतीने शिष्यवराचे पाणावती लोचन ।। १ ।।

पुष्प सुशोभित यज्ञमंडपी, मंगल स्वर कोंदले
विप्रवरांनी एकसुराने, वेदाशिश म्हटले
गणेश—चंडी—सौर—संहिता, दिव्य यागदर्शन
ब्रह्मवृंद हे आज्याहुतीने, तुष्टविती सुरगण ।। २ ।।

तृप्त जाहल्या सर्व देवता, हविर्भाग घेऊन
पूर्णाहुतीने होय सांगता, सामवेद गाऊन
वस्त्रदक्षणा देती गुरुवर, विप्रगणां वंदुन
कृतज्ञतेने विप्रवरांच्या, हृदयी हो स्पंदन ।। ३ ।।

''अभिषेकी'' हे ''जितेन्द्र'' होऊन, करिती स्वर गुंफण
रसिकवरांची ''दाद'' मिळविती, भावपूर्ण गाऊन
सप्तसुरांच्या अमृतधारा, झरती कंठातून
धुंद जाहली गानसभा ही, अमृतात न्हाऊन ।। ४ ।।

विद्या भारती जगत् गुरुंनी, मानपत्र देऊन
ब्रह्मश्रींना शाल अर्पिली, हेच आम्हां भूषण
भूषण आम्हा ''तुला'' जाहली, रजताने तोलून
भक्तगणांची अंतःकरणे, गेली भाराऊन ।। ५ ।।

— हरिभाऊ कानडे

# श्रीवासुदेव निवास द्वारा प्रकाशित नवी पुस्तके

## प. पू. योगिराज श्री गुळवणीमहाराज यांचे समग्र चरित्र खालील तीन खंडात प्रकाशित

| | | |
|---|---|---|
| १ | 'जीवन गंगा' आद्य कलश | रु. ३५/– |
| २ | 'जीवन गंगा' द्वितीय कलश | रु. ३५/– |
| ३ | 'जीवन गंगा' अंतिम कलश | रु. ३५/– |
| ४ | 'स्मर्तृगामींच्या स्मृति' (प. पू. श्रीमहाराजांच्या आठवणी | रु. ३०/– |
| ५ | 'श्रीसद्गुरु साधक सुसंवाद' (प्रश्नोत्तरी) | रु. २५/– |
| ६ | श्रीदत्तवाक्सुधा (प. पू. श्रीदत्तमहाराजांचे चरित्र व त्यांची काही प्रवचने) | रु. २५/– |
| ७ | **श्रीवासुदेव निवास व पंथराज – त्रैमासिक** | |
| | **वार्षिक वर्गणी** | **रु. ३२/–** |
| | **आजीव सभासद** | **रु. ३००/–** |

मुद्रक : जयभारत प्रिंटिंग प्रेस, ठाणे–४०० ६०२ प्रकाशक : श्री वासुदेव निवास प्रकाशन, एरंडवणे, पुणे–४११ ००४